महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४००००१, दू.०२२-२२६२०२३१/३२,

Website-www.doa.maharashtra.gov.in Email ID: directorateofart@gmail.com


---

**संदर्भ:-शासन निर्णय क्र.एडीआर-२०२५/प्र.क्र.५०/तांशि-६, दि.०६.०६.२०२५**

# प्रसिध्दीपत्रक

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र/पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ देणेबाबत

--------

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता १वर्ष, २वर्षे व ३वर्षे कालावधीच्या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थाच्या प्रथम वर्षाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दिनांक १९.०५.२०२६ ते १९.०६.२०२६ या कालवधीत पूर्ण करण्यात आली आहे.

वरील ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्यास संस्था स्तरावर ऑफलाईन प्रवेश देण्याची मुदत दिनांक २४.०६.२०२६ अशी निश्चित करण्यात आली होती. संस्था स्तरावरील ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेस या प्रसिध्दपत्रकान्वये दिनांक ११.०७.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच, संस्था स्तरावर ऑफलाईन प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचा Joining Report संस्थेकडून ऑनलाईन रित्या प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर भरण्यास दिनांक १३.०७.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

संस्था स्तरावर ऑफलाईन प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचा Joining Report संस्थेकडून ऑनलाईन रित्या प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर विहित वेळेत भरणे क्रमप्राप्त आहे. विहित वेळेत विद्यार्थ्यांचा Joining Report न भरणाऱ्या कला परिसंस्थेचे प्रवेश ग्राह्य धरले जाणार नाहीत, याची सर्व कला परिसंस्थांनी नोंद घ्यावी.

दिनांक:-२५.०६.२०२६

सही/-
(आरती श्रावस्ती)
प्र. निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सही/-
(डॉ.किशोर इंगळे)
कला संचालक, कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई